# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 07/09/2023 (गुरूवार) सायंकाळ

---

## विनयभंग

**पो.स्टे. एमआयडीसी बोरी** :— दिनांक ०५/०९/२०२३ चे १७.३० वा. ते १७.४० वा. दरम्यान फियार्दी ही घरी एकटी असता यातील आरोपी नामे— पंकज मोहन बागडे, वय २१ वर्ष, रा. सुकळी बेलदार हा फिर्यादीच्या घरी येवून फिर्यादी ही घरी स्वयंपाक करीत असता आरोपी याने फिर्यादीच्या चेहऱ्यावर किस करण्याचा प्रयत्न करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ४५२, ३५४ भांदवि. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक राय मो. नं. मो. क्र. ९९२३४२४७६७ हे करीत आहे.

## दुखापत

**पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत ०५ किमी अंतरावर मौजा लिंगा शिवर भुशन ठाकुर यांचे शेत येथे दिनांक ०६/०९/२०२३ चे १५.०० वा. ते १५.१० वा. दरम्यान फिर्यादी नामे— जयाराम बाजीराव उईके, वय ६२ वर्ष, रा. वंडली वाघ हा भुशन ठाकुर यांचे शेतात मागिल ४ महीन्यापासुन महीन्याने काम करतो. यातील फिर्यादी हा मालकाचे बैल चारत असता यातील **आरोपी नामे— शिवकुमार वरठी, रा. शिर्शावाडी शाम ठाकुर यांचे शेत** व एक ईसम तेथे आले व दारू पिउन एकमेकांना शिवीगाळ करू लागले तेव्हा फिर्यादी याने शिवीगाळ का करीत आहे असे म्हटले असता याच कारणावरून आरोपी याने फिर्यादीस लाकडी काडीने डोक्यावर उलटया हाताचे मनगटावर खांदयावर मारून जखमी केले व शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार प्रभुदास दलाल ब. नं. १६२५ पोस्टे काटोल मो. नं. ९५८८६५३९०४ हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**पो.स्टे एमआयडीसी बोरी** :– अंतर्गत ०३ कि. मी. अंतरावरील गणेशपुर शिवार येथे दिनांक २६/०८/२०२३ चे ०४.३० वा. सुमारास आरोपी व मृतक नामे– प्रमोद शंकरराव मसराम, वय ३६ वर्ष, रा. गुपचुप सुकळी ता. हिंगणा हा आपल्या ताब्यातील मोटरसायकल एम. एच.– ४०/ सी.– ८६०१ ने दिनांक २६/०८/२०२३ चे ०४/३० वा. चे सुमारास जात असता आपले वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून स्वत: जखमी होवुन उपचारादरम्यान दिनांक २९/०८/२०२३ चे १४/०० वा. मेडीकल कॉलेज नागपुर येथे मरण पावला.

सदर प्रकरणी सरतर्फे रामेश्वर लालबाबु राय, पोस्टे एमआयडीसी बोरी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ (अ) भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक रामेश्वर राय पोस्टे एमआयडीसी बोरी मो. नं. ९९२३४२४७६७ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**